# 2013 सीसॅट पेपर II

**खाली दिलेले परिच्छेद वाचा आणि प्रत्येक परिच्छेदावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे नमूद करा. या प्रश्नांची उत्तरे परिच्छेदावर आधारित असली पाहिजेत.**

**Read the following passages and respond to the questions that follow each passage. Your responses should be based on the passages.**

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित 1 ते 5 प्रश्नांची उत्तरे द्या :**

टेकड्यांच्या सभोवार पसरलेल्या सूक्ष्माश्मांच्या मागोव्यावरून असा निष्कर्ष अटळपणे निघतो की ही अवजारे अशा एका धातूपूर्व आणि मातीकामपूर्व काळाची साक्षीदार असावीत की जेव्हा येथील सखल खोऱ्यांत जंगले होती. या संरचनेत जनावरांची कळपे, अन्न जमा करणे, थोडी शेती आणि थोडीफार शिकार. यासह हिला मध्य-अश्म संस्कृती म्हणता येईल.

या माणसांच्या टोळ्यांना सतत भटकावे लागे. लोखंडासारखा धातू स्वस्तपणे मिळू लागेपर्यंत स्थिर वसाहती बनणे शक्य नव्हते. मौर्यांच्या विजयापूर्वीच्या काळात दख्खन पठाराच्या प्रदेशात कुठेही लोखंड वापरले जात होते असे मानणे कठीण आहे. या प्रदेशात तांब्याचे साठे सहज मिळत नाहीत. आणि कौटिल्याच्या 'अर्थशास्त्रा'ला सुद्धा दक्षिणेत लोखंड असल्याची वार्ता नव्हती. खोऱ्यांच्या तळाशी असणारी दलदल किंवा जंगल लागवडीखाली येण्यापूर्वी रानटी लोक साहजिकच टेकड्यांच्या कडेकडेने असणारा मार्ग वापरत असावेत.

या वाटांवर ये-जा करणऱ्या टोळ्या संख्येने मोठ्या नसाव्यात. त्यांची जमिनीवर मालकी असणाच्या प्रश्नच उद्‌भवत नाही. कारण जमिनीची मालकी ही कल्पना प्राचीनकाळी नव्हती. नांगराने जमीन कसली जाईपर्यंत स्थिर शेती निरर्थकच होती. त्यासाठी खोऱ्यांच्या तळातील सुपीक जमिनीवरील जंगल साफ करणे भाग होते. आणि आपल्या मोसमी पावसाच्या प्रदेशात ही जंगलतोड मुबलक लोखंडी अवजारांशिवाय अशक्य होती. रानटी लोकांच्या दृष्टीने जमीन ही मालमत्ता नसून केवळ प्रदेश असतो. माझ्या मते महाराष्ट्रातील 'गावसई'ची प्रथा म्हणजे एकाजागी स्थिर वस्ती होण्यापूर्वीच्या काळातील आजही जपलेली स्मृती असावी. ही प्रथा म्हणजे ('भगत' ठरवेल तेव्हा) सर्व स्थानिक देवता, भुतेखेते यांची शांती करणे. यातील वैशिष्ट्य असे की या काळात गाव पूर्णपणे निर्मनुष्य करून सर्वांना सात किंवा नऊ दिवस गावाबाहेर रहावे लागे. शेतावर किंवा झाडाखाली राहून आवश्यक ती पूजा आणि रक्तबळी झाल्यावर गावकरी अशा विश्वासाने परतत की आता भरघोस पीक आणि सुबत्ता येईल आणि रोगराई टळेल. परत येण्याचा सण म्हणजे पुनश्च केलेली वस्ती मानली जात असावी. शेतीपूर्व काळातल्या लोकांची स्थिर देवस्थाने अशाच ठिकाणी असणे आवश्यक होते की जिथे त्यांचे नेहमीचे रस्ते एकमेकांस मिळत. जिथे ते वस्तुविनिमय आणि त्यासंबंधातले सण आणि समाजाचे विधी करत, जिथे अनेक टोळ्या मिळून आपले नैमित्तिक सुफलतेचे विधी एकत्र साजरे करतात. यासाठीच मातृदेवतांची आदिम ठाणी चौरस्त्यावरच असणे तर्कदृष्ट्या क्रमप्राप्त ठरते.

**Read the following passage and answer the questions from 1 to 5 :**

Following the microlith groupings along the hill, one conclusion is unavoidable. These tools represent the pre-metal and pre-pottery stage when the valley bottom was not cleared of jungle. With herds of animals, considerable food - gathering, sporadic cultivation to eke out, and some hunting, they may be called Mesolithic cultures.

Such a population had to shift constantly from place to place. Permanent settlement could not come before the advent of cheap metal like iron. It is difficult to imagine the use of iron anywhere in the Deccan, earlier to the Mauryan conquest. The deposits of copper in this region are uncommon. Even the Arthashastra does not speak of iron in this area. The natural route of the savages before the swampy or forested valleys were opened for cultivation, must have been along the hillocks.

The groups that moved along these tracks could not have been numerous. There was no question of their possessing land, for land - ownership is not a primitive concept. Fixed plots were meaningless till the plough had conquered the soil. For this, the fertile bottom lands had to be cleared of forest, which was not possible in our monsoon country without iron tools in plenty. Land to the savage is territory, not property. In my opinion the still revered Maharashtrian custom of gamva - sai' dates back to the presettlement days. This used to be the propitiation (at such date as the Bhagat might set) of all local deities, spirits and goblins. The characteristic feature was that villages used to get deserted as every human being had to leave the village for seven or nine days. After living in the fields or under trees for the period, and performing the required worship and blood sacrifices, the inhabitants would return with the hope of better crops, eradication of diseases and general well-being. The ceremonial return must be being conceived as resettlement. The fixed cult - spots for pre - agricultural people would necessarily be where their regular paths crossed, places where they met for - barter where the communities performed ceremonies or where they celebrated their periodic fertility cults together. Thus, the crossways were logically the sites for the mother - goddess cults.

1. **पुढील दोन विधानांचा विचार करा.**

(अ) गावसईमध्ये लोक चांगल्या व वाईट वृत्तींची आत्म्याची पूजा करत.

(ब) लोक अशी पूजा करीत कारण त्यांना ते घाबरत होते आणि त्यांना ते प्रसन्न करू इच्छित होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही बरोबर व (ब) ही (अ) ची कारणमीमांसा आहे.

(2) दोन्ही बरोबर परंतु (ब) ही (अ) ची कारणमीमांसा नाही.

(3) कोणतेही योग्य नाही.

(4) (अ) बरोबर परंतु (ब) चूक.

**Consider the following two statements :**

(a) During Gamva Sai the people worshipped good and evil spirits.

(b) The people worshipped them because they were afraid of them and wanted to please them.

**Answer options :**

(1) Both the statements are correct and the second is the correct explanation for the first.

(2) Both the statements are correct but the second is not entirely the explanation for the first.

(3) Neither of the statements is correct.

(4) The first is correct, the second is not.

2. **जोपर्यंत शेती होत नव्हती, तोपर्यंत सामान्यपणे पुढीलपैकी काय दिसत नव्हते?**

(1) गावसई (2) वनांवर प्रेम

(3) जमिनीबाबत अभिमान (4) वरीलपैकी एकही पर्याय योग्य नाही

**When the agriculture was still to be practised what of the following was uncommon?**

(1) gamva sai (2) love for the jungle

(3) boasting of earmarked plots close by (4) none of the above options is correct

3. **'गावसई' च्या प्रथेत पुढीलपैकी कशाचा समावेश होतो?**

(अ) दैवतांची शांती करणे (ब) गाव निर्मनुष्य करणे

(क) पूजा आणि रक्तबळी (ड) वस्तुविनिमय

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (क), (ड) (2) (अ), (ब), (क), (ड)

(3) (ब), (क), (ड) (4) (अ), (ब), (क)

**What are the practices involved in the custom of Gamva Sai' ?**

(a) Propitiation of gods (b) Village should be deserted

(c) Ritual worship and blood sacrifice (d) Barter trade

**Answer options :**

(1) (a), (c), (d) (2) (a), (b), (c), (d)

(3) (b), (c), (d) (4) (a), (b), (c)

4. **लेखकाच्या मते स्थिर शेती सुरू होण्यासाठी पुढीलपैकी कोणती गोष्ट अनावश्यक ठरते?**

(अ) नांगराने जमीन कसणे (ब) लोखंड मुबलक उपलब्ध होणे

(क) जंगल तोडून साफ करणे (ड) वरीलपैकी एकही नाही

**पर्यायी उत्तरे :**

(1) (क) (2) (ब)

(3) (ड) (4) (अ)

**According to the author, what is not a pre - requisite for the beginning of settled agriculture ?**

(a) Land should be tilled with a plough. (b) Iron should be abundantly available.

(c) Forests need to be cut and cleared. (d) None of the above.

**Answer options :**

(1) (c) (2) (b)

(3) (d) (4) (a)

5. **मातृदेवतांची ठाणी चौरस्त्यावर असत कारण :**

(अ) तेथे भटक्या टोळ्यांचे मार्ग एकमेकांस मिळत. (ब) तेथे भटक्या टोळ्या वस्तुविनिमय करत.

(क) जंगलतोड करणे शक्य नव्हते. (ड) दऱ्यांमध्ये दलदल असे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब), (क) (2) (अ), (ब), (ड)

(3) (अ), (ब) (4) (अ), (ब), (क), (ड)

**Sites for mother - goddess cults were at crossways because**

(a) This is where the paths of the nomadic people crossed.

(b) This is where the nomadic people exchanged goods.

(c) They could not cut the forests.

(d) Valleys were Swampy.

**Answer options :**

(1) (a), (b), (c) (2) (a), (b), (d)

(3) (a), (b) (4) (a), (b), (c), (d)

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित 6 ते 8 प्रश्नांची उत्तरे द्या :**

दुष्काळ ही पर्जन्याच्या अभावामुळे निर्माण झालेली आणीबाणीची परिस्थिती असते. पर्जन्याचा अभाव पाऊस अपुरा पडल्यामुळे किंवा दोन पावसाळी टप्प्यांमध्ये अंतर पडल्यामुळे निर्माण होतो. दुष्काळाचे तीन प्रकार असतात. हवामानशास्त्रीय दुष्काळ ही अशी परिस्थिती असते, ज्यावेळेस प्रत्यक्ष पडलेला पाऊस हवामानाच्या प्रकारानुसार अपेक्षित पावसापेक्षा खूप कमी असतो, आणि असा प्रकार मोठ्या प्रदेशावर घटतो. म्हणजेच पाऊस एकतर वेळेत सुरु होत नाही आणि एकूण कमीही पडतो. असे दुष्काळ प्रामुख्याने शुष्क आणि निम-शुष्क प्रदेशांमध्ये केंद्रित झालेले असतात. देशाच्या अशा भागांमध्ये पर्जन्यातील विचलन देखील अधिक असते.

जलशास्त्रीय दुष्काळ पृष्ठभागावरील नदी, तलाव, ओढे आणि जलाशय यांच्यातील पाणी आटण्याशी आणि भूजलपातळी खालावण्याशी संबंधित असतात. जंगलतोड, खाणकाम, रस्तेबांधणी, अति-चराई आणि अतिरिक्त भू-जल उपसा यामुळे हे दुष्काळ वाढतात. वरील सर्व घडामोडींमुळे जलशास्त्रीय असंतुलन निर्माण होते ज्याचे पुढे दुष्काळसदृश स्थितीमध्ये रुपांतर होते. शेतीमूलक दुष्काळ किंवा मृदाजन्य दुष्काळ तेव्हा निर्माण होतात तेव्हा जेव्हा माती आपली बाष्पधारण क्षमता घालवून बसते. यामुळे पिकांची सुदृढ वाढ होत नाही. हवामानशास्त्रीय दुष्काळ नसतानाही अशी परिस्थिती निर्माण होते किंवा याच्या विरुद्धही होते. अशा दुष्काळाची तीव्रता अधिक वाढल्यास एकही झाड जगणार नाही अशी परिस्थिती निर्माण होते. या स्थितीला वाळवंटीकरण असे म्हणतात.

जरी वरील तिन्ही प्रकारचे दुष्काळ स्वतंत्रपणे घडत असले तरी हवामानशास्त्रीय दुष्काळ हे जलशास्त्रीय आणि शेतीमूलक दुष्काळाचे प्रमुख कारण असते. लांबलेल्या हवामानशास्त्रीय दुष्काळाची परिणती जलजन्य दुष्काळामध्ये होते, आणि त्यानंतर, कदाचित शेतीमूलक दुष्काळात हे रुपांतरण अतिशय मंद गतीने होते.

**Read the following passage and answer the questions from 6 to 8 :**

Drought is basically a distress situation caused by the failure of rainfall. This failure may be due to insufficient rains or due to a wide gap between two or more spells of rain. Droughts are of three types. A meteorological drought is a situation when the actual rainfall is significantly less than the climatologically expected rainfall over a wide area. Here the rains do not arrive in time and are inadequate. Such droughts are mainly concentrated in the areas falling between arid and semi - arid zones of the country and are characterised by high variability of rainfall.

Hydrological droughts are associated with the drying up of surface water such as rivers, streams, lakes and reservoirs and fall in ground water levels. Such droughts are augmented by deforestation, mining, road construction, overgrazing and withdrawal of excessive ground water. All these factors contribute to hydrological instability leading to droughts. Agricultural droughts or soil droughts occur when soils lose their effective moisture conserving capacity. This prevents healthy crop growth. Such droughts may occur even when meteorological droughts do not occur and vice versa. Under extreme conditions of such a drought no plant exists and such a condition is called desertification.

Although all these three forms of drought occur independent of each other the occurrence of meteorological drought is the basic reason for hydrological and agricultural droughts. Prolonged meteorological drought results into hydrological drought, and may, thereafter, lead to agricultural drought. This transition is a very slow process.

6. **खालील दोन विधाने पहा.**

(अ) कोरड्या क्षेत्रात पाऊस कमी-जास्त पडण्याची शक्यता जास्त नसते.

(ब) जलशास्त्रीय दुष्काळ वृक्षतोडी व अमर्याद चराईमुळेच चालू होतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही चूक (2) दोन्ही बरोबर

(3) (अ) चूक (ब) बरोबर (4) (अ) बरोबर (ब) चूक

**Consider the following two statements :**

(a) In dry areas chances of receiving high or low rainfall are not high.

(b) Hydrological droughts begin with illicit felling of trees and overgrazing only.

**Answer options :**

(1) Both are incorrect (2) Both are correct

(3) (a) is incorrect (b) is correct (4) (a) is correct (b) is not

7. **खालील विधाने वाचा व योग्य तो पर्याय निवडा.**

(अ) हवामानशास्त्रीय दुष्काळ हे प्रत्येक दुष्काळाचे कारण असते.

(ब) जलशास्त्रीय दुष्काळ नेहमीच मानवनिर्मित घटकांची परिणती असते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) ही दोन्ही बरोबर आहेत. (2) (अ) व (ब) ही दोन्ही चूक आहेत.

(3) (अ) बरोबर आहे व (ब) चूक आहे. (4) (ब) बरोबर आहे व (अ) चूक आहे.

**Read the following statements and choose the appropriate option.**

(a) Climatological drought is the cause for every drought.

(b) Hydrological drought is always an outcome of the human factors.

**Answer options :**

(1) (a) and (b) are correct (2) (a) and (b) both are wrong

(3) (a) is correct, (b) is wrong (4) (b) is correct, (a) is wrong

8. **एका विशिष्ट क्षेत्रामध्ये विहिरींची संख्या वाढल्यास कोणत्या प्रकारचा दुष्काळ पडण्याची शक्यता आहे?**

(1) जलशास्त्रीय (2) शेतीमूलक

(3) हवामानशास्त्रीय (4) पर्जन्यमूलक

**If the wells grow in number in a specific area what kind of drought is likely to occur ?**

(1) Hydrological (2) Agricultural

(3) Climatological (4) Rain based

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित 9 ते 12 प्रश्नांची उत्तरे द्या :**

संपूर्ण मानवजात खात असलेल्या मूठभर पिकांच्या व पशुधनाच्या प्रजाती असलेल्या जनुकीय विविधतेत, जी जननद्रव्य साधनसंपत्ती म्हणूनही ओळखली जाते, शेतीची कार्यक्षमता सुधारण्याची मोठी शक्ती आहे. त्याचबरोबर ज्या प्रजाती आपल्याला अन्न व वस्त्र पुरवितात त्या प्रजातींचा आधार रुंदावण्याची मोठी संधी उपलब्ध आहे. जगाची लोकसंख्या जी की पुढील 40 वर्षांमध्ये दुप्पट होण्याची अपेक्षा आहे, त्यालाही खाद्य पुरविण्यासाठी शेती पुरेशी आहे. आणि त्यासाठी गरज आहे ती वनस्पती आणि प्राणी या दोन्ही प्रकारच्या विविधतेचा वापर करण्याची.

जनुकीय विविधतेच्या पायावर आधारित बदलाच्या विशिष्ट टप्प्यापर्यंत पिकांमध्ये सुधारणा करून उत्पादन वाढविता येते. इतिहासामध्ये आजपर्यंत उत्तम दर्जाच्या वनस्पतींची निवड करून आणि त्यांची पैदास करण्याचे काम हे वैयक्तिक शेतकऱ्यांनी तुटपुंज्या साठ्यावर त्यांच्या शेतामध्ये केले. यामध्ये प्रजाती कधी कधी उत्स्फूर्तपणे त्यांच्या जवळपासच्या वन्य नातलगांशी संयोग होऊन वर्धित झाल्या. लागवड केलेली पिके जरी एकाच प्रजातीची असली तरी क्षेत्रीय परिस्थितीशी जुळवून घेणारे अविश्वसनीय जनुकीय गुण त्यात एकवटलेले आहेत.

औद्योगिक राष्ट्रांमध्ये फार थोडेच शेतकरी शेतीमध्ये वनस्पतींच्या प्रजननासाठी वेळ अथवा जमीन देऊ शकतात. आज उच्च प्रतीच्या कार्यक्षम पिकांची निवड ही शासकीय शास्त्रज्ञामार्फत आणि खाजगी कंपन्या ज्या शेतकऱ्यांना खास जातीचे बियाणे लागवडीसाठी विकतात त्यांच्यामार्फत केली जाते. उच्च कामगिरी आणि मोठ्या उत्पादनाच्या बदल्यात शेतकऱ्यांनी त्यांचे स्वातंत्र्य दिले, ज्याचा परिणाम म्हणजे मोजक्याच यशस्वी वाणाची लाखो एकरावर लागवड होत आहे.

दक्षिणेतील मक्याच्या पानावरील करपा रोगाच्या पंधरा वर्षाच्या प्रलयकारी साथीनंतर अमेरिकेतील मक्याचे उत्पादन पंधरा टक्क्यांनी घटले आणि देश पिकातील जनुकीय भेद्यतेच्या स्थितीबाबत जागरुक झाला. डकोटा येथील गव्हाच्या शेतास किंवा लोवा येथील मक्याच्या शेतीला भेट देणाऱ्यास एकसमान उंचीच्या एकाच पिकाच्या ओळी दूरवर क्षितिजापर्यंत पसरलेल्या दिसतात. या एकसारखेपणामध्येही एक प्रकारची विविधता असते, जी जगामधील इतर शेतकऱ्यांना उपलब्ध होत नाही. वनस्पतीचे प्रजनन करणाऱ्या खाजगी उद्योगांनी अनेक प्रकारच्या वनस्पतींचा हाती घेतलेला अभ्यास, कीडीचा उद्रेक इत्यादी बाबतची विस्तृत उपलब्ध माहिती आणि जगभरातील हवामान स्थिती यावर आधारित पूर्वसूचना देणारी यंत्रणा तयार करणे आणि बियाणे विकणाऱ्या कंपन्यामार्फत त्या ठिकाणी ती तात्काळ वाहून नेण्याची व्यवस्था करणे, या सर्वांमुळे तेथील अमेरिकन शेतकऱ्यांना घातक भेद्यतेच्या स्थितीपासून संरक्षण मिळाले. त्यांना ही सुरक्षा मोठी किंमत मोजून आली. त्यामुळेच अमेरिकन शेतकरी बियांण्यावर प्रतिवर्षी चार बिलीयन डॉलरपेक्षा जास्त खर्च करतो आहे. आणि जरी वास्तवात प्रति टन धान्य पीक काढण्याचा खर्चात मागील तीन दशकाच्या तुलनेत घट झाली असली तरी प्रतिएकर उत्पादन खर्च दुप्पट झाला आहे.

**Read the following passage and answer the questions from 9 to 12 :**

The genetic diversity within the handful of crop and livestock species that feed humanity so-called germplasm resources-holds much of the potential for improving agricultural performance. At the same time, great opportunities lie in broadening the base of the species that provide our food and fiber. An agriculture, sufficient to feed the world's population that is expected to

double in the next 40 years, will need to use both plant and animal diversities.

Increasing of harvests rests on a foundation of genetic diversity by bringing about improvement in the crop upto a desired level. Throughout the history, the selection and breeding of superior plants was done by individual farmers working on limited stocks in their fields, augmented by occasional spontaneous crosses with wild relatives nearby. Cultivated crops, though single species, contained an incredible array of genetic types adapted to local circumstances.

In industrial countries, few farmers can spare the time or land for plant breeding. The selection of high performance crops today is done by government scientists and by private companies who sell specially bred seed to farmers for planting. Farmers have traded their independence for higher performance and larger harvests; as a result, a few successful varieties are being planted on millions of acres.

Fifteen years after a devastating epidemic of Southern Corn Leaf Blight cut the U.S. corn harvest by 15 per cent and alerted the nation to the genetic vulnerability of its crops, a visitor to the wheat fields of the Dakotas or the corn fields of lowa can still see row upon row of uniform plants stretching to the horizon. Yet under this uniformity lie forms of diversity not available to most of the world's farmers. The many varieties under study by the private plant breeding industry, the widely available information on pest outbreaks and weather conditions worldwide that constitute an "early warning system," and a seed industry that can transport varieties quickly to areas that need them all protect American farmers from fatal vulnerability. These safeguards have come at a substantial price : U.S. farmers now spend over $ 4 billion each year on seeds, and while the cost per ton of grain harvested has declined in real terms over the past three decades, the cost per harvested acre has doubled.

9. **पुढील दोन विधानांचा विचार करा.**

(अ) आज मोठ्या प्रमाणात विविध प्रजाती विस्तृत क्षेत्रावर लागवड केल्या जात आहेत.

(ब) जनुकीय विविधतेमुळे हे साध्य झाले आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(a) (अ) बरोबर आहे व (ब), (अ) ची कारणमीमांसा देते.

(b) (अ) चुकीचे आहे म्हणून (ब) बाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

(c) (अ) बरोबर आहे परंतु (ब), (अ) ची कारणमीमांसा देत नाही.

(d) परिच्छेदावरून या विधानांबाबत काही सांगता येत नाही.

**Consider the following two statements :**

(a) Today a large number of widely diff. species are getting planted over extensive areas.

(b) Genetic diversity has led us to this situation.

**Answer options :**

(1) (a) is correct and (b) is the correct explanation of (a).

(2) (a) incorrect therefore the question does not arise about (b).

(3) (a) is correct but (b) is not the correct explanation thereof.

(4) Nothing can be made out from the passage about the statements.

10. **पुढील दोन विधानांचा विचार करा.**

(अ) शेतकऱ्यांसाठी व खाजगी कंपन्यांना सगळ्यांनाच अधिक नफा हीच बाब सर्वांत महत्त्वाची राहिली आहे.

(ब) अधिक चांगले वाण निर्माण करण्यास्तव जंगली वनस्पती लागवड केल्या जात असलेल्या प्रजातींना नेहमीच नियमितपणे मदत केली आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(a) दोन्ही बरोबर. (b) दोन्ही चूक

(c) (अ) बरोबर, (ब) चूक (d) (ब) बरोबर, (अ) चूक

**Consider the following two statements :**

(a) Higher profits is the main consideration for the farmers and the private companies all alike.

(b) The wild crops have regularly helped their cultivated counter parts throughout the history in producing superior varieties.

**Answer options :**

(1) Both are correct (2) Neither is correct

(3) (a) is correct (b) is not (4) (b) is correct (a) is not

11. **आपण जनुकीय विविधतेचा इतिहास पाहिला तर शेतकऱ्यांचा :**

(अ) चांगल्या कामगिरीमुळे लाभ झाला आहे.

(ब) अधिक उत्पन्नामुळे श्रीमंत झाले आहे.

(क) साचेबंद/सारख्या लागवडींच्या अडचणींतून मुक्त झाले आहेत.

(ड) परंतु सद्य:स्थिती त्यांना दुसरा निर्णय घ्यायला मुभा देत नाही.

(इ) विपणनविहित वृत्ती त्यांना तसे करण्यास बाध्य करतात.

(ई) त्यांना लाभ मिळतो परंतु त्याकरता बरीच किंमत मोजावी लागते.

**वरील कोणती विधाने बरोबर आहेत?**

(1) (अ), (ब), (ड), (इ) (2) (अ), (ब), (क), (ड), (इ)

(3) (अ), (ब), (ई), (ड), (इ) (4) (अ), (ब), (क), (ड), (इ), (ई)

**If we see the history of the genetic diversity the farmers.**

(a) have benefitted from higher performance.

(b) have become rich because of the larger production.

(c) have overcome the problems of planting of uniform plants.

(d) but the circumstances do not allow them to decide for themselves.

(e) the market driven tendencies force them to follow.

(f) and the benefits come to them at a great cost.

**Which of the above statements are correct ?**

(1) (a), (b), (d) and (e) (2) (a), (b), (c), (d), (e)

(3) (a), (b), (d), (e) and (1) (4) (a), (b), (c), (d), (e), (f)

**12. औद्योगिक देशांत पूर्वी चांगल्या प्रजातींची पैदास करणारे शेतकरी आजकाल करत नाहीत कारण :**

(अ) शासकीय शास्त्रज्ञ आता ते स्वतः करीत आहेत.

(ब) खाजगी कंपन्या हे काम आपल्या लाभासाठी करत आहेत.

(क) शेतकरी दुसऱ्या कामात व्यग्र आहेत.

(ड) शेतकऱ्यांना आपली जमीन दुसऱ्या कामासाठी वापरावयाची आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) (2) (क), (ड)

(3) (अ), (ब), (क) (4) (अ), (ब), (क), (ड)

**In industrial countries the farmers who earlier did plant breeding are no more resorting to it because :**

(a) Govt. scientists want to take it upon themselves.

(b) Private companies undertake plant breeding for their interests

(c) The farmers are busy otherwise.

(d) The farmers want to put their land to other use.

**Answer options :**

(1) (a) and (b) (2) (c) and (d)

(3) (a), (b) and (c) (4) (a), (b), (c) and (d)

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित 13 ते 14 प्रश्नांची उत्तरे द्या :**

अनेक लोक म्हणतात की 21 वे शतक ज्ञानाचे शतक आहे. परंतु यावर खोलात जाऊन विचार करणारे लोक म्हणतात की हे शतक मनाचे असेल. असं जर असेल तर भारताला लोकसंख्येमुळे आघाडी मिळणार आहे. भारताची 55% लोकसंख्या ही पंचवीशीच्या आतील वयाची आहे. याचा अर्थ असा की भारताच्या भविष्याला आकार देण्यासाठी 6000 लक्ष मने उपलब्ध आहेत.

पण मन व मनोभूमिका यात मूलभूत फरक आहे. मन बुद्धिमत्ता निर्देशित करते. त्याच्यामुळे तुम्हाला चलाख निरीक्षणे, चलाख विश्लेषणे व चलाख संश्लेषणे इत्यादी कृती करता येतात. पण मनोभूमिका तुमच्या वृत्ती व तुमची जीवन जगण्याची पोहोंच निर्धारित करते. भारतात भारतीय मन व भारतीय भूमिका यात प्रचंड लढाई आहे. भारतीय मन आपल्याला एकविसाव्या शतकात नेत आहे आणि यात शंका घेण्याला जागा नाही. पण भारतीय मनोभूमिका भारताला चौदाव्या, पंधराव्या, सोळाव्या शतकात मागे खेचत आहे.

शतकांपूर्वी भारतीय मनाने जागतिक खेड्याची संकल्पना ''वसुधैव कुटम्बकम्'' (संपूर्ण जग हे कुटुंब आहे.) या घोषासह प्रस्तावित केली. आपण म्हणतो की आम्ही एक आहोत पण बोलतो तसा व्यवहार करतो काय? जेव्हा दोन जपानी व्यक्ती एकत्र येतात तेव्हा त्या किती व्यक्ती होतात ते आपण जाणतो. त्या भक्कम संघ तयार करतात व अकरा होतात. कोणीतरी विनोदाने म्हणाले होते की जेव्हा दोन भारतीय व्यक्ती एकत्र येतात तेव्हा त्या शून्य होतात. कारण त्या एकमेकांना छेद देऊन व्यर्थ ठरवितात. त्या संघ घडवू शकत नाहीत आणि ही भारतीय मनोभूमिका आहे.

माझा मूळ पूर्वपक्ष असा नाही की भारतीय मनाला आकार देण्याचा प्रश्न नसून, भारतीय भूमिकेला आकार देण्याची गरज आहे. आपल्याला मन तसेच मनोभूमिका या दोन्हीच्या प्रश्नांकडे पाहायला सुरुवात केली पाहिजे. आपल्याला फक्त हुशार मने, अधिक बुद्धिवान मने, अधिक निरीक्षणक्षम

मने, अधिक विश्लेषक मने, चांगली मने जी अधिक शहाणे विश्लेषण करतील, अशी मने कशी मिळतील एवढेच पाहून चालणार नाही तर त्या बरोबरीने आपल्याला एकविसाव्या शतकातील भारत आकाराला आणणे शक्य करणाऱ्या, सकारात्मक, रचनाक्षम, भविष्याकडे पाहणाऱ्या, परस्परांना प्रेरक ठरणाऱ्या मनोभूमिकाही कशा घडवायच्या हे पाहिले पाहिजे.

**Read the following passage and answer the questions from 13 to 14 :**

Many people say that 21st century is a century of knowledge, but the people who think more deeply about it say, it is going to be a century of mind. If this is the case then India has demographic advantage. India has 55% of its population less than 25 years old. This means that there are 6000 lakh odd minds to shape destiny of India.

But there is a fundamental difference between the mind and the mindset. Mind represents intellect, mind allows you to make smart observations, smart analysis, smart synthesis etc. but it is the mindset which determines your attitude and your approach to life. In India, there is this huge battle between the Indian mind and Indian mindset. The Indian mind is taking us into 21st century and there is no doubt about it, but it is the Indian mindset which is drawing us back into 14th, 15th, 16th century.

Centuries ago Indian mind introduced the concept of global village with a slogan, "Vasudhaiv Kutumbakam" (Entire world is a family). We say that we are one family but are we practising what we say ? We know that when two Japanese come together, how many Japanese they make ? They form a great team and become eleven. Someone in a lighter vein has said that when two Indians come together, they become zero as they neutralize each other. They do not make a team and this is the Indian mindset.

My basic premise is not that shaping of Indian minds is not required and only changing of the Indian mindset should be attempted. We should start taking up both. We should not only be contented with clever minds, more intelligent minds, more observant minds, more analytical minds, better minds synthesizing in a more clever way, but also mindsets that are positive, constructive, forward looking, mutually reinforcing, - mind sets that will make it possible for us to shape 21st century India.

13. **आजच्या जगताबाबत खालील कोणते विधान योग्य आहे?**

(a) आजचा काळ हुशारीचा आहे. (b) अनेकांच्या मते हा काळ ‘मनाचा’ आहे.

(c) काहींच्या म्हणण्यानुसार हा काळ ज्ञानाचा आहे. (d) वरील एकही विधान योग्य नाही.

**Which of the statements given below about todays world is correct?**

(1) It is a clever peoples world. (2) Many feel it is the 'mind'.

(3) Some say it is the 'knowledge (4) None of the above.

14. **पुढील कोणते विधान अयोग्य नाही**

(a) भारतातील सुमारे 55% लोकांची मनोभूमिका अर्वाचीन आहे.

(b) भारतातील सुमारे 45% लोकांची मने बुरसटलेली आहेत.

(c) भारतात वयस्कर लोक बहुसंख्य नाहीत.

(d) भारतातील सुमारे 55% लोक हुशार विश्लेषणे करतात.

**Which of the following statements is not incorrect ?**

(1) About 55% of the Indians have modern mindset.

(2) About 45% of the Indians have old traditional mind.

(3) The elderly people are not in majority in India.

(4) About 55% of the Indians make intelligent analysis.

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित 15 ते 19 प्रश्नांची उत्तरे द्या :**

भारतीय संविधानाची उद्देशिकाच मुळी ‘‘आम्ही भारताचे लोक...’’ पासून सुरु होते. तिथे कोणत्याही जातीवाचक अथवा धर्मवाचक शब्द वापरलेला नाही. या उद्देशिकेतून स्पष्ट होते की, भारतीय संविधानाने लोकशाहीमध्ये जनतेला सर्वोच्च स्थान दिले आहे. भारतीय जनता जर शासनाची निवड करत असेल तर शासनाच्या कारभाराविषयी, त्याच्या अंगउपांगाविषयी जाणून घेण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. या सजगतेमधूनच जनतेला शासकीय कारभारात सहभागी होण्याची संधी उपलब्ध होते म्हणजेच ‘प्रातिनिधिक’ लोकशाहीपासून ‘सहभागी’ लोकशाहीकडे वाटचाल सुरु होते. शासनाची धोरण आखणी व अंमलबजावणी यांच्यामध्ये जनतेचा सक्रिय सहभाग यावरच खऱ्या लोकशाहीचा डोलारा उभा असतो. जिथे जनता शासकीय कारभारामध्ये सक्रिय सहभागी होण्याइतकी सक्षम नसते, अशा वेळी प्रबळवर्गाच्या हितसंबंधांचे रक्षण होण्याची शक्यता वाढते. यातून सामाजिक न्याय मिळण्यास मोठा अडथळा निर्माण होण्याची शक्यता असते.

जगभर माहीतगार नागरिक असलेला गुणवत्ताप्रधान समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत. माहितीच्या अधिकार अधिनियमाचा स्वीकार करुन या प्रयत्नांमध्ये भारतही सामील झाला आहे. या अधिनियमामध्ये ‘माहीतगार नागरिक’ संज्ञा आढळते. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 19 (1) (क) मधील भाषण व अभिव्यक्तीस्वातंत्र्यामध्ये माहितीचा अधिकार अध्याहृत आहे. हे भारतातील विविध न्यायालयांनी सांगितले आहे. माहितीचा अधिकार मानवी हक्कांचा मूलस्रोत असल्याचे संयुक्त राष्ट्रसंघाच्या वैश्विक जाहीरनाम्यामध्ये नमूद आहे.

अशा वेळी सामाजिक न्यायाचे रक्षण व प्रस्थापनेच्या दृष्टीने देखील माहितीचा अधिकार कळीची भूमिका बजावू शकतो. संविधानाच्या

प्रास्ताविकामध्ये सर्व नागरिकांना 'न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व' प्राप्त होईल असा निर्धार व्यक्त केला आहे. संविधानाच्या प्रास्ताविकामध्ये 'न्याय' या शब्दाला विचारपूर्वक प्रथम स्थान देण्यात आले आहे. न्यायानंतर स्वातंत्र्य, समानता व बंधुत्व येते. न्याय ही मूलभूत बाब आहे. न्यायाअभावी स्वातंत्र्य, समानता व बंधुत्व प्राप्त करता येणार नाहीत. न्यायाच्या अभावी सामाजिक विषमतेकडे वाटचाल सुरू होते. ही सामाजिक विषमता ही केवळ नैसर्गिक संसाधनांच्या असमान वाटपातूनच निर्माण होत नाही तर माहितीचे असमान वाटपसुद्धा याला कारणीभूत असते. समाजातील प्रभुत्वकारी गट कायम माहितीवर ताबा ठेऊन सत्ता व संपत्तीवर आपले धुरिणत्व कायम ठेवत असतो. याला भारतीय इतिहासही साक्ष आहे. म्हणून समाजातील उपेक्षित घटकांना 'माहितीच्या शक्ती'ची जाणीव करून दिली तर, सामाजिक विषमतेवर विजय प्राप्त करणे शक्य होईल. म्हणून न्याय मिळवण्याच्या प्रक्रियेत माहिती अधिकार कायद्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळेच माहितीचा अधिकार हा जगभरातील नागरी संघटना व मानवाधिकार चळवळी यांच्या आस्थेचा विषय बनला आहे.

पर्यावरणवादी चळवळ व माहितीचा अधिकार यांचाही जवळचा संबंध आहे. संविधानाच्या अनुच्छेद 21 नुसार प्रत्येक नागरिकाला जीवित व स्वातंत्र्याचा अधिकार आहे. दुसऱ्या शब्दात जीवित व स्वातंत्र्यावर परिणाम करणाऱ्या प्रत्येक बाबींविषयी जाणून घेण्याचा प्रत्येक नागरिकाला अधिकार आहे. 1992 मध्ये ब्राझीलमध्ये 'रियो डी जनेरो' येथे झालेल्या वसुंधरा परिषदेत याचा पुनरुच्चार करण्यात आला. हेच पर्यावरणवादी चळवळींचे मूळ सूत्र असल्यामुळे, त्यांनीही माहिती अधिकाराचा हिरिरीने पुरस्कार केला आहे.

**Read the following passage and answer the questions from 15 to 19 :**

Preamble to constitution of India starts with "We the people.." It does not refer to people of any particular caste or religion, which signifies that the constitution of India places its people at the highest position in democracy. When people of India elect our government, we also have a complete right to get aware of all its aspects and governance. Such awareness gives a chance to actually participate in the process of governance which in turn advances the democracy from being merely representative to become participative. Success of democracy largely depends on participation of its population in making and implementation of government policy. Where common people are not able to actively participate in the process of governance, possibility of protection of rights of select empowered class increases manyfold. This holds the potential of eventually becoming a major obstacle in the path of Social Justice.

The efforts of creation of knowledge based societies of 'Informed citizenry' are ongoing in various parts of the world. India too, has joined the bandwagon by accepting the Right to Information. 'Informed citizenry' term appears in the RTI Act. Various courts in India have reported that Right to Information is inherent to Freedom of Speech and Expression provided in article 19(1)(a) of Constitution of India. Additionally United Nations Organizations stated in its Universal Declaration that Right to Information is fundamental to human rights.

In the light of this, Right to Information can play a pivotal role in the process of protection and establishment of social justice. Preamble to constitution of India has resolved for "Justice, Freedom, Equality and Fraternity" to all its citizens. Deliberately the word 'justice' is placed first in the order. Justice is fundamental, in absence of it, freedom, equality and fraternity cannot be achieved. Absence of justice leads to social inequality. This inequality stems not only out of unequal distribution of natural resources but also out of unequal distribution of information. Ruling class controls information to maintain its hegemony over power and resources. Indian history has witnessed this time and again. Social inequality can be won over by making the socially oppressed classes aware of 'power of Information' and therefore Right to Information is extremely crucial in the process of achieving justice. It is for this reason that Right to Information has become a matter of utmost interest for numerous civil society organizations and human rights movements.

Right to Information and Environmental movement are also closely connected. Article 21 of the constitution provides Right to Life and Liberty. In another a words, citizen have a right to know everything that has impact on life and liberty. The same was also reiterated in the earth summit of Rio de Janerio, Brazil held in 1992. This also being the core principle of environmental movement, they have keenly promoted Right to Information.

15. **माहितीचा अधिकार खालीलपैकी कोणत्या मूलभूत हक्कांशी अधिक संबंधित आहे :**

(अ) जीवित व स्वातंत्र्याचा हक्क　　(ब) शोषणाविरुद्धचा हक्क

(क) भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क　　(ड) शैक्षणिक हक्क

**खालीलपैकी कोणता पर्याय योग्य आहे?**

(1) (अ), (क)　　(2) (अ), (ब), (क)

(3) (अ), (ड), (क)　　(4) (अ), (ब), (क), (ड)

**Right to Information is more related to which of the following fundamental rights :**

(a) Right to Life and Liberty

(b) Right against exploitation

(c) Right to freedom of speech and expression

(d) Right to Education

**Which of the option given below is correct ?**

(1) (a) (c) (2) (a) (b) (c)

(3) (a) (d) (c) (4) (a) (b) (c) (d)

**16. पुढील दोन विधानांचा विचार करा.**

(अ) माहितीच्या अधिकाराचा बरेच वैयक्तिकरीत्या पाठपुरावा करीत आहेत.

(ब) बऱ्याच संस्था, गट व देश त्यांना या बाबत अद्यावत माहिती असो वा नसो माहिती अधिकाराचा पिच्छा पुरवीत आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही बरोबर (2) कोणतेही बरोबर नाही

(3) (अ) बरोबर (ब) चूक (4) (ब) बरोबर (अ) चूक

**Consider the following two statements :**

(a) Right to information is being pursued by individuals all over.

(b) Various societies, movements and countries well informed or otherwise are following right to information.

**Answer options :**

(1) Both are correct (2) Neither is correct

(3) (a) is correct (b) is not incorrect (4) (b) is correct (a) is not incorrect

**17. पुढील विधानांचा विचार करा :**

अ. माहिती न देणे सामाजिक अन्यायाचे मूळ आहे.

ब. जेव्हा सत्तेत सर्वांचा सहभाग नसेल तेथे सामाजिक अन्याय राहू शकतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (ब) बरोबर व (अ) त्याचे बरोबर स्पष्टीकरण (2) (ब) बरोबर, परंतु (अ) त्याचे बरोबर स्पष्टीकरण नाही.

(3) दोन्ही चूक (4) (ब) चूक (अ) बरोबर

**Consider the following statements :**

(a) Non dissemination of the information is a root cause of social inequality.

(b) When the participation in the governance is not all round social unjustice could prevail.

**Answer options :**

(1) (b) is correct and (a) is the correct explanation of (b) .

(2) (b) is correct but (a) is not the correct explanation of (b)

(3) Both (a) and (b) are incorrect

(4) (b) is incorrect (a) is correct

**18. पुढील विधानांचा विचार करा :**

(अ) नागरिकांना माहितीचा अधिकार आवश्यक हे प्रथम रियो दि जानेरो समिटमधे म्हटले आहे.

(ब) भारतातील बऱ्याच न्यायालयांनी वारंवार म्हटले आहे की सामाजिक न्यायासाठी माहितीचा प्रसार आवश्यक आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही बरोबर (2) कोणताही बरोबर नाही

(3) (अ) बरोबर (ब) चूक (4) (ब) बरोबर (अ) चूक

**Consider the following statements :**

(a) "Citizenry has right to know" was for the first time said in the summit at Rio-de Janerio.

(b) Many courts in India have reiterated that dissemination of information is an absolute must for attaining social justice. Now state whether.

**Answer options :**

(1) Both are correct (2) Neither is correct

(3) (a) is correct (b) is not (4) (b) is correct (a) is not

**19. खालीलपैकी कोणत्या मार्गामुळे प्रातिनिधिक लोकशाहीचे सहभागी लोकशाहीमध्ये रुपांतरण सूचित होते?**

(अ) संसद व विधानमंडळामध्ये प्रश्न विचारणे.

(ब) प्रशासनाविरोधात तक्रार दाखल करणे.

(क) माहिती अधिकाराच्या वापराद्वारे शासन व प्रशासन पारदर्शक बनविणे.

(ड) शासकीय कारभाराविषयी जाणून घेणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) आणि (क) (2) (ब) आणि (क)

(3) (क) आणि (ड) (4) (ब) आणि (ड)

**Which of the following indicates the transformation of representative democracy into participatory democracy ?**

(a) By asking questions in parliament and state legislature
(b) By launching complaint against administration
(c) Using RTI act to make government and administration transparent.
(d) Getting knowledge of functioning of governance

**Answer options :**

(1) (a) and (c) (2) (b) and (c)
(3) (c) and (d) (4) (b) and (d)

**पुढील उतारा वाचून त्यावर आधारित 20 ते 22 प्रश्नांची उत्तरे द्या :**

1991 च्या मध्यापासून भारतात आर्थिक विकासाचे वारे वाहू लागले. याची प्रमुख कारणे म्हणजे बहिर्गत कर्जाचा वाढता बोजा, आटोक्याबाहेर गेलेला आंतरराष्ट्रीय ताळेबंद, भाववाढीचा दरात वाढ होण्याची तीव्र शक्यता आणि वित्तीय अडचणी, आखाती युद्ध आणि सोविएत अर्थव्यवस्थेची पडझड हे बाह्यघटकही या सुधारणा घडवून आणण्यास कारणीभूत होते. या आर्थिक संकटातून बाहेर येण्याचा मार्ग काढण्यासाठी आणि अविनाशी विकास प्रक्रिया निश्चित करण्यासाठी औद्योगिक, व्यापार आणि सार्वजनिक क्षेत्रात काही महत्त्वाचे धोरणात्मक बदल करणे आवश्यक होते. स्थायीकरणासाठी पाऊले उचलणे गरजेचे होते ज्यायोगे अर्थसंकल्पातील वित्तीय आणि चालू खात्यातील तूट कमी होऊ शकेल. आर्थिक सुधारणांचे महत्त्वाचे उद्दिष्ट हे होते की देशाच्या साधनसंपत्तीचे वाटप आणि एकूण निर्णय प्रक्रिया ही बाजारपेठेच्या कार्यतंत्रानुसार व्हावी.

आर्थिक सुधारणांनतरच्या काळात दीर्घकालीन आर्थिक विकासाच्या संदर्भात फार मोठा आशावाद निर्माण झाला आहे. मागील दोन दशकांमध्ये भारत हा सर्वांत वेगाने वृद्धिंगत होणाऱ्या, जगातील दहा ते बारा देशांमधील एक होता. काही महत्त्वाच्या स्थूल अर्थशास्त्रीय चल घटकांची या काळातील कामगिरी लक्षात घेण्यासारखी होती. 1997 ते 2002 मध्ये भाववाढ दर घटला होता. नवव्या आणि दहाव्या आर्थिक योजनेच्या काळात स्थूल एतद्देशीय बचतीची, स्थूल एतद्देशीय उत्पादनातील शेकडेवारी 23.1% वरुन 28.2% वर गेली होती. याच काळात स्थूल एतद्देशीय गुंतवणूक वाढली होती. आणि वित्तीय तूट थोडी कमी झाली होती. त्याचप्रमाणे परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक, परदेशी चलन साठा या घटकांची कामगिरी सुधारली होती.

